"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"
दूरध्वनी क्र.-०७१२ २५५६७८८
Email: ...

महाराष्ट्र शासन

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१

ई-मेलद्वारे

क्रमांक : कक्ष-१०(अ)५/वर्कनि/प्र.क्र.६४/ १३१ /२०२६-२७
नागपूर : ४४० ००१, दिनांक: 03/08/२०२६.

विषय :- महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीच्या दिनांक १२/०६/२०२६ रोजी झालेल्या बेठकीबाबत

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष १०(अ)५/वर्कनि/प्र.क्र.३९(२४-२५)/१३०/२०२६-२७.दि.२०/०७/२०२६

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक १२/०६/२०२६ रोजी मा.अध्यक्ष तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणास या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये पाठविण्यात आलेले आहेत.

प्रकरणी याद्वारे कळविण्यात येते की,उपरोक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीअंतर्गत देण्यात येणा-या विविध लाभांत सनदी लेखापाल यांचे अहवालानुसार खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र. | देण्यात येणार लाभ | देण्यात येणारी रक्कम | वाढ करण्यात येत असलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | नेसर्गिक / अपघाती मृत्यु प्रकरणी आर्थिक सहाय्य मिळणेबाबत | रु.५०,०००/- | रु.७५,०००/- |
| २. | सभासदांच्या पाल्यास प्रोत्साहनात्मक बक्षीस:- १०वी व १२वी मध्ये | | |
| | १. ९०टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास | रु.५०००/- | रु.१०,०००/- |
| | २. ९५टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास | रु.१००००/- | रु.१५,०००/- |
| ३. | सभासदांच्या पाल्यास पुस्तकीय अनुदान मिळणेबाबत:- | | |
| | १. ८ वी व ९ वी करीता (९०%) | रु.२०००/- | रु.५०००/- |
| | २. १० वी करीता (९०%) | रु.३०००/- | रु.६०००/- |
| | ३. १२ वी करीता (९०%) | रु.३०००/- | रु.६०००/- |
| | ४. व्यवसायिक पदवी पाठयक्रम, वैद्यकिय, अभियांत्रिकी व एम.बी.ए.पदवी पाठयक्रमाकरीता (७०%) | रु.५०००/- (फक्त एकदा) | रु.८०००/- (फक्त एकदा) |
| ४. | अ) सभासदाचे पाल्यास पदवीचे शिक्षण घेणेकरीता अग्रीम:- ८ टक्के व्याजाचे दराने १२ मासिक हप्त्यात परतफेड करण्याच्या अटीवर. | रु.१,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| | ब) सभासदांना किंवा त्यांच्या पाल्यास वैद्यकिय उपचारासाठी अग्रीम:- ८ टक्के व्याजाचे दराने १२ मासिक हप्त्यात परतफेड करण्याच्या अटीवर. | रु.१,००,०००/- | रु.२,००,०००/- |

प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, वनकल्याण निधीअंतर्गत देण्यात येणा-या विविध लाभांत उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेली वाढ आपले अधिनस्त वनकल्याण निधीचे सर्व सभासद यांचे निदर्शनास आणून द्यावी तसेच आपले अधिनस्त सर्व कार्यालयांना (सामाजिक वनीकरण व वन्यजीव शाखेसह) त्याप्रमाणे आवश्यक त्या सुचना निर्गमित करण्यात याव्यात. उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेली लाभाची वाढीव रक्कम हे पत्र निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू राहिल याबाबत नोंद घ्यावी.

(जो.गुरूप्रसाद)
अध्यक्ष.कार्यकारी समिती,
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी तथा
अपर प्रधान मख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग)
महाराष्ट्र राज्य,नागपूर.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रा) सर्व

प्रतिलीपी :- प्रशासकीय अधिकारी कक्ष-१३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.